**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४८३३/२०२६**
**निशाणी क्र. ४**

**MHTH250085082026**

## वसई येथील ४ थे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, वसई यांचे न्यायालयात
## (पिठासिन अधिकारी – एन.यु. मसुरकर)

| | | |
|---|---|---|
| १. | अपराध घडल्याचा दिनांक | :– १६/०७/२०२६ |
| २. | अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिनांक | :– १६/०७/२०२६ |
| ३. | फिर्याददाराचे नाव | :– आकाश विजय चव्हाण, पो.शि. /२२०५५ |
| ४. | आरोपीचे नाव | :– **फैदोशीबीबी सत्तर मंडळ**<br>वय : ४९ वर्षे, व्यवसाय : अंडापाव विक्री,<br>रा. : रूम नं.५, ओमकार सोसायटी, गणेशनगर,<br>नायगाव पुर्व, ता. वसई, जि. पालघर. |
| ५. | गुन्हयाचे विवरण | :– खालीलप्रमाणे. |

दिनांक १६/०७/२०२६ रोजी रात्री २३.३० वाजताचे सुमारास वरील आरोपीने नायगांव पोलीस ठाण्याचे कार्यक्षेत्रातील नायगाव पुर्व येथील परेरानगर, ता. वसई, जि. पालघर येथे रोडलगत अंडापाव विक्रीची हातगाडी सार्वजनिक रोडच्या कडेला लावून त्या हातगाडी वरती गॅस सिलेंडर बाटला हा गॅसशेगडिला जोडणी करून वापर करीत असतांना निष्काळजीपणाने किंवा बेपवाईने आग किंवा कोणत्याही ज्वलनशील सामग्रीसह स्वत:चा जीव धोक्यात असणारी व दुस–या व्यक्तीला हानी पोहचवण्याच्या किंवा दुखापत पोहचवण्याच्या मार्गाने वर्तन केले म्हणून भारतीय न्याय संहिता कलम २८७ प्रमाणे गुन्हा या न्यायालयाच्या कार्यक्षेत्रामध्ये केला आहे.

17/8/26

वसई
दिनांक १७/०८/२०२६

**(एन.यु. मसुरकर)**
४ थे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वसई.

प्रश्नः–   तुम्हाला पोलीस दोषारोपपत्राच्या नकला मिळाल्या का?
उत्तरः–   होय.

प्रश्नः– तुमच्यावर ठेवण्यात आलेला दोषारोप तुम्हाला वाचून दाखवला तो तुम्हाला समजला काय ?
उत्तरः– होय.

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. ४८३३/२०२६
निशाणी क्र. ४

प्रश्नः- तुम्हाला गुन्हा कबूल आहे काय ?

उत्तरः- होय.

आरोपीची सही ..........................................

आरोपीने गुन्हयाचा तपशील त्याच्या मातृभाषेत वाचून, समजावून सांगण्यात आला. आरोपीने गुन्हा कबूल केला आहे.

17/8/26

वसई
दिनांक १७/०८/२०२६

(एन.यु. मसुरकर)
४ थे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वसई

## न्यायनिर्णय
### (दिनांक १७/०८/२०२६)

सदर आरोपीविरुध्द भा. न्या. संहीता २८७ प्रमाणे खालील आरोपाबाबत प्रकरण दाखल केलेले आहे. आरोपीने स्वेच्छेने त्यांचे वकीलांचे उपस्थितीत गुन्हा कबूल केला आहे. त्यानंतर आरोपीला बोलावून गुन्हा कबूल केल्यामुळे होणा-या परिणामांची माहिती दिली. त्या परिस्थितीत सुध्दा आरोपी हा गुन्हा कबूल करत आहे. त्यामुळे सदरील कबुली ही स्वखुशीने केली असल्याचे निदर्शनास येते. वरील प्राप्त परिस्थिती लक्षात घेतली असता सरकार पक्षाचे फिर्यादीमधील कथन निर्विवादपणे सिध्द झालेले आहे. त्यामुळे आरोपीला सदर गुन्हयाकरिता दोषी धरण्यात येत आहे. आरोपीचे म्हणणे ऐकले. आरोपीचा पहिलाच गुन्हा असल्याचे कागदपत्रावरुन स्पष्ट होते. त्यामुळे आरोपीचा पहिला गुन्हा असल्यामुळे खालील शिक्षा न्याय होईल. करिता खालीलप्रमाणे आदेश करण्यात येतो :-

## आदेश

१. आरोपी **फैदोशीबीबी सत्तर मंडळ** यांना भा. न्या. संहीता २८७ प्रमाणे चे गुन्हयाकरिता दोषी धरुन सदर गुन्हयाबद्दल आरोपीला रक्कम रुपये **२,०००/-** (**अक्षरी दोन हजार रुपये मात्र**) दंड ठोठावण्यात येत आहे. दंड न भरल्यास आरोपीला **१ दिवस** साध्या कैदेची शिक्षा सुनावण्यात येत आहे.

२. न्यायनिर्णयाची प्रत आरोपीला मोफत देण्यात येत आहे.

17/8/26

वसई
दिनांक १७/०८/२०२६

(एन.यु. मसुरकर)
४ थे न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, वसई

R.No. 1349/26
Received ~~Cash Security / Cost /~~
~~Maintenance~~ / Fine / ~~Penalty~~
Rs. 2000/- (दोन हजार रु. मात्र)
17/8/26
Sr. Clerk (Cash & Finance)
Jt. Civil Court, J. D. Vasai